# ।। मराठी ।।

"लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी"

नाव : शुभांगी बापू भांडगे
इयत्ता : ११वी तुकडी : अ.
कॉलेज : एस. बी. पाटील. ज्युनिअर, कॉलेज.

विषय :- जागतिक भाषा दिनानिमित्त "निबंध स्पर्धा"




२७ फेब्रुवारी.

जागतिक भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

Page No. Date :

# निबंध लेखन

## आधुनिक काळात मराठी भाषेचे महत्व.

मराठी म्हंटल की आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो तो ग्रामीण महाराष्ट्र आणि वेगवेगळ्या जिल्ह्यात वेगवेगळी बोलली जाणारी मराठी भाषा. आपल्याला आठवते, मराठी भाषेचे गुणवान मोठ्या मोठ्या कवींनी सुध्दा आपल्या कवितेतून, लेखणीतून मराठी भाषेची थोरवी मांडली आहे.

पण आजच्या बदलत्या युगात जो तो हिंदी आणि इंग्रजी भाषेच्या मागे धावू लागला आहे. माझा या भाषांना मुळीच विरोध नाही किंवा त्या भाषेवर टीका ही करायची नाही, पण आपली प्रथम मातृभाषा सांभाळून प्रत्येकाने बाकीच्या भाषा सुध्दा अवगत कराव्या असं माझं परखड मत आहे, माणसाने जिथे गरज पडेल त्या ठिकाणी आपल्या मराठी भाषेत बोलण्याचा प्रयत्न करावा, पण सध्या मराठी अस्मितेची ओळख असणारे आपले पुणे व मुंबई या ठिकाणी सुध्दा लोक हिंदी भाषेचा गरज नसताना खूप वापर करताना दिसतात.

हिंदी बोलू नये असं माझं बिलकुल म्हणणं नाही, परंतु एक मुंबईच्या व्यक्ती व एक पुण्याचा व्यक्ती हे जर भेटले तर ते मराठी भाषेत संवाद न करता ते सरळ सरळ हिंदीतून संवाद साधतात यातून मला असं सांगायचं आहे की दोघांचीही मातृभाषा मराठी असताना आपण जाणून बुजून या भाषेचा तिरस्कार करताना दिसून आलं आहे.

त्यापेक्षा ग्रामीण भागात पाहिलं तर आपल्याला मराठी भाषेचा वापर जास्त प्रमाणात दिसतो, खरं तर ग्रामीण भागामुळे मराठी भाषा जिवंत आहे असं म्हंटल तर वावगं ठरणार नाही, पण आज असं म्हणायची वेळ आली आहे,

Page No.  Date :

" नको करू दूर आपली मराठी भाषा,
शहर वासियांनो हीच आहे आमची आशा"

आपल्या मराठी भाषेचे संवर्धन करणं हीच सध्या काळाची गरज आहे, पण याची सुरूवात युवकांपासून झाली तर फार मोठा बदल होईल, कारण नवतरूण जास्त मराठीचा वापर करत नाहीत, असं चित्र सध्या समाजात दिसून येत आहे.

" अभिमान आहे आम्हांला मराठी आमचा बाणा,
याच मराठी भाषेने केला आमचा ताठ कणा"

---